**नियमित दिवाणी दावा नं. ५७/२०२०**
**निशाणी क्रमांक ३१ वरील आदेश**
**सी.एन.आर.क्र. MHK0110008032020**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ४७ नियम १ सह कलम ११४ अन्वये निशाणी क्र. २० वरील झालेला आदेश पुनर्विलोकनासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जान्वये वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. या दाव्यामध्ये निशाणी क्र. २० कडे त्रयस्थ अर्जदार यांना हक्क संबंध येतो असे कथन करून अर्ज दाखल केला. मात्र पुर्वी त्रयस्थ अर्जदार यांनी त्यांचे हिस्सेची संपूर्ण शेतजमीन मिळकत नोंदणीकृत दस्त क्र. ५३४५/२०१८ दिनांक ०६/०८/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. ६ यांना विक्री केलेचे कथन केले. त्यामुळे त्यांना प्रस्तुत कामी कोणतीही दाद मागणेचा हक्क संबंध, अधिकार राहिलेला नाही ही वस्तुस्थिती मा. न्यायालयासमोर चुकीच्या पध्दतीने माडली असल्याने सदरचा निशाणी क्र. २० चा अर्ज मंजूर झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा निशाणी क्र. २० चा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. तसेच त्रयस्थ अर्जदार यांना नमुद नोंदणीकृत दस्ताविरुध्द दाद मागणेची असल्यास सदर कामी दाद मागता येणार नाही. तसेच वादी यांनी नमुद दस्ताबाबत कोणतीही दाद प्रस्तुत दाव्याकामी मागितलेली नाही. त्यामुळे निशाणी क्र. २० वरील आदेशामध्ये सकृतदर्शनी चुक दिसून येते. त्यामुळे निशाणी क्र. २० वरील आदेशाचे पुनर्विलोकन व्हावे अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी म्हणणे दाखल करून विरोध

दर्शविलेला आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. वादी यांना दावा मिळकत विक्री केलेबाबत कल्पना असूनही त्यांनी पक्षकार केलेले नाही. यावरून वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करणेबाबत प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ व २ यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

५. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील वादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ व वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यास कैफियत दाखल केली. त्यानंतर निशाणी क्र. २० कडे त्रयस्थ अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १ नियम १० अन्वये अर्ज दाखल करून प्रतिवादी म्हणून सामिल करणेबाबत दिनांक १२/१०/२०२० रोजी विनंती केली. प्रस्तुतचा अर्ज माझे सन्माननिय पूर्वाधिकारी यांनी दिनांक २०/१२/२०२१ रोजी मंजूर करून वादी यांना प्रस्तुत आदेशान्वये दुरूस्ती करण्याकरिता आदेशित केले व सदर आदेशाचे पुनर्विलोकन व्हावे म्हणून वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

७. निशाणी क्र. २० कडील त्रयस्थ अर्जदार यांचा अर्ज त्यावरील म्हणणे, तसेच माझे सन्माननिय पूर्वाधिकारी यांचा दिनांक २०/१२/२०२१ रोजीचा आदेश पाहिला. निशाणी क्र. २० कडील अर्जामध्ये त्रयस्थ अर्जदार यांचे कथन आहे की, त्या वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या आत्या असून प्रतिवादी क्र. १ यांची बहिण आहे.

तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ ह्या त्रयस्थ अर्जदार यांच्या नणंद आहेत. या कामातील दावा मिळकतीचे अद्याप वादी, प्रतिवादी व त्रयस्थ अर्जदार यांचे दरम्यान अद्याप वाटप झालेले नाही. पुढे यातील प्रतिवादी क्र. १ यांनी त्रयस्थ अर्जदार यांना दावा मिळकतीचे वाटप करायचे आहे असे खोटे सांगून रजिस्ट्रार ऑफीस, हातकणंगले येथे नेऊन तथाकथीत दिनांक ०६/०८/२०१८ रोजीचे खोटे खरेदीपत्र केलेले आहे. सदरचे खरेदीपत्र प्रतिवादी क्र. ६ यांच्या लाभात करण्यात आलेले आहे. याची पूर्ण जाणीव वादी यांना असून देखील वादी यांनी त्रयस्थ अर्जदार यांना याकामी पक्षकार केलेले नाही.

८. ही मान्य बाब आहे की, त्रयस्थ अर्जदार हे या कामातील प्रतिवादी क्र. ६ यांचे लाभात दिनांक ०६/०८/२०१८ रोजी करून दिलेले खरेदीपत्र मान्य करतात. मात्र सदरचे तथाकथीत खरेदीपत्र हे खोटे असल्याचे कथन करतात. या अर्जाकामी निशाणी क्र. ३/१ वरील दावा मिळकतीच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्रयस्थ अर्जदार यांचे नांव दावा मिळकतीस असल्याचे दिसून येते. यावरून वादी यांनी दाव्याकामी नमुद केलेल्या मिळकतीमध्ये त्रयस्थ अर्जदार यांचा संबंध असल्याचे प्रतित होते. त्याचबरोबर वादी यांनी प्रस्तुत दाव्याकामी वंशावळीमध्ये त्रयस्थ अर्जदार यांचा उल्लेख करून पुढे त्यांनी त्यांच्या हिश्याची मिळकत ही प्रतिवादी क्र. ६ यांना विक्री केल्याचे देखील कथन केले असून त्याबाबत वादी यांची कोणतही हरकत नसल्याचे कथन केले आहे. त्रयस्थ अर्जदार यांनी दावा मिळकत मधील क्षेत्र विक्री केलेल्या प्रतिवादी क्र. ६ यांना या कामात पक्षकार करण्यात आलेले आहे. त्यामुळे या अर्जातील कथने, युक्तीवाद यामध्ये नमुद केल्याप्रमाणे निशाणी क्र. २० वरील आदेशामध्ये सकृतदर्शनी चुक दिसून येते यामध्ये तथ्य आढळून येत नाही. त्यामुळे निशाणी क्र. २० वरील त्रयस्थ अर्जदार यांना सामिल करुन घेणेबाबतचा झालेला आदेश पुनर्विलोकन होणेस अपात्र आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** वादी यांचा निशाणी क्र. ३१ चा पुनर्विलोकनाचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

**पेठ–वडगांव.** **( एस. डी. सोनवणे )**
**दिनांक ३०/११/२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**